# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

**१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com


जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संच मान्यता २०१६-१७/२०१६/8

दिनांक :- 2 JAN 2017

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या, सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय :- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत**

**संदर्भ :-१ दि. १८.१०.२०१६ रोजी मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे येथे झालेल्या सहविचार सभेमध्ये दिलेल्या सुचना**

**२. या कार्यालयाचे पत्र दिनांक २१.१०.२०१६, ११.११.१६, १७.११.१६ व २८.११.१६.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, दि. ०२.११.२०१६ ते दि. ०४.१२.२०१६ अखेर मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे सुचनेनुसार माध्यमिक शाळांचे संच मान्यता देण्याचे काम सुरू झाले असल्यामुळे पुणे जिल्हयातील फक्त अनुदानित माध्यमिक शाळा सलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता २०१६-१७ पुर्ण करण्यात आलेली आहे.

पुणे जिल्हयातील **वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय आणि माध्यमिक शाळा सलग्न कायम विना अनुदानित, विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयांची** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची संच मान्यता अद्याप पुर्ण झालेली नसल्यामुळे खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार पुणे जिल्हयातील सर्व तालुक्यातील उपरोक्त कनिष्ठ महाविद्यालयांचे संच मान्यता शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. ज्या अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची संच मान्यता अद्याप केलेली नाही अशा सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी दिनांक ०७.०१.२०१७ रोजी उपस्थित राहुन संच मान्यता करुन घ्यावी. दि.०७.०१.२०१७ नंतर जर एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयाची संच मान्यता राहिल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. **(सदर संच मान्यता शिबीरात तक्ता (अ,ब,क) सादर करु नये. याबाबत वेगळे आदेश निर्गमित करण्यात येतील.)**

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे नांव | दिनांक | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ |
| १ | पुणे | जुन्नर, खेड, आंबेगांव, शिरुर, पिंपरी चिंचवड | **०४.०१.२०१७** | मराठवाडा मित्र मंडळाचे कनिष्ठ महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे |
| | | बारामती, दौंड, इंदापूर, सासवड, पुणे शहर | **०५.०१.२०१७** | |
| | | हवेली, मुळशी, मावळ, भोर, वेल्हा | **०६.०१.२०१७** | |
| २ | पुणे/ अहमदनगर/ सोलापूर | पुणे/अहमदनगर/सोलापूर उर्वरित सर्व अनुदानित/ कायम विना अनुदानित / विना अनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालय | **०७.०१.२०१७** | |

MRaut 2.1.17

(मिनाक्षी राऊत)
सहा.**शिक्षण संचालक**
**पुणे विभाग पुणे-१**